|| श्रीशंकर ||

## संतकवि श्रीदासगणू विरचित

# “श्री गुरुपाठाचे अभंग”

संतचुडामणी स्वामी गजानन
तयाचे महिमान ऐका आतां ||
योगयोगेश्वर हाचि एक जाणा
शेगांवींचा राणा गजानन ||
तयाचिया पायीं ठेवा आतां शिर
तरी व्हाल पार भवाब्धीच्या !|
गणूदास म्हणे आली ही पर्वणी
घ्यावी ती साधुनी प्रयत्नानें ||१||
कोण हा कोठिचा कांहींच कळेना
ब्रह्माचा ठिकाणा कोण सांगे ||
साक्षात ही आहे परब्रह्ममूर्ती
आलीसे प्रचीती बहुतांना ||
जानराव देशमुख झालासे आजारी
मृत्युशय्यैवरी पडला होता ||
समर्थांचे तीर्थ तयासी पाजतां
दूर झाली व्यथा गणू म्हणे ||२||
बंकटलालाचे तें झाले असें घर
प्रती पंढरपूर स्वामीमुळे ||
लांबलांबुनिया दर्शनास येती
लोक ते पावती समाधान ||
भक्त भास्कराच्या -साठीं तें जीवन
केलें हो निर्माण खाचाडांत ||
गणूदास म्हणे एका प्रदोषकाळीं
दिसले चंद्रमौळी एक्या भक्ता ||३||
कावळे हाकिले पंक्तीच्यामधूनी
अकोलींच्या बनी समर्थाने |
अजूनीपर्यंत चाललें तें व्रत
पहा अकोलींत जाऊनियां ||
पितांबरा हस्तें आणविला पाला
वठलेल्या वृक्षाला कोंडोलींत ||
गणू म्हणे शेगांवी विस्तवावांचून
दाविली पेटवून चिलीम ती ||४||
मुकिंदा भक्ताचे कान्होले ते दोन
केले कीं सेवन आवडीनें ||
मोहळाच्या माशा डसतां अपार
राहिला तो स्थिर योगिराणा ||
कुंभक करुनी काटे मधमाशांचे
टाकिले अंगाचे बाहेर की |

गणूदास म्हणे योग ज्यासी आला

अजिंक्य तो झाला जगामध्यें ॥५॥

गीताशास्त्रामाजीं ब्रह्माचें लक्षण

सांगी नारायण अर्जुनातें ॥

जळेना तुटेना जे कां कशानेंही

तेंच तत्व पाही ब्रह्म असे ॥

याचें प्रत्यंतर गोसाव्या दाविलें

मळ्यामाजीं भले कृष्णाजीच्या ॥

गणूदास म्हणे ऐसा अधिकारी

एक या भूवरी गजानन ॥६॥

बाळापुरी होता एक रामदासी

नाम होते ज्यासी बाळकृष्ण ॥

माघ वद्य नवमी पर्वणी ती थोर

अवघे बाळापूर आनंदले ॥

त्याच दिनी स्वामी गेले बाळापुरा

बाळकृष्णा घरा आवर्जून ॥

गणूदास म्हणे द्वारामाजीं ठेले

कौतुक दाविले अभिनव ॥७॥

जटेचे ते केस रुळती पाठीवरी

कुबडी तीही करी चंदनाची ॥

ऊर्ध्व तो त्रिपुंड्र भालासी लाविला

कंठी शुध्द माळा तुळशीची ॥

रामनामाची ती केलीसे गर्जना

वस्त्र अंगी जाणा हुरमुजीचें ॥

गणूदास म्हणे स्वामी रामदास

हाच असे खास पूर्वीचा कीं ॥८॥

बायजाबाई नामे माळ्याची कन्यका

एक होती देखा मुंडगांवांत ॥

आजन्म राहिली बायजा ब्रह्मचारी

जेवी पंढरपुरी जनाबाई॥

राजाराम कवराचा फोड बरा केला

देऊन अंगायला समर्थांनीं ॥

गणूदास म्हणे बापुन्याकारण

करविले दर्शन विठ्ठलाचे ॥९॥

वासुदेवानंद योगयोगेश्वर

जयाचा अधिकार फार मोठा ॥

तेही आले स्वामी शेगांवीं भेटाया

कांही ती कराया ब्रह्मचर्चा ||

एक तो श्रीविष्णु एक विश्वेश्वर

दोघात अंतर मुळी नाही ॥

रक्तपिती व्याधी गंगाभारतीची

निवटिली साची गणू म्हणे ॥१०॥

खंडू पाटलाचे भाऊ अनावर

होते वतनदार शेगांवींचे ॥

आपुल्या शक्तीचा अभिमान त्यां झाला

तोच निवटिला समर्थांनीं ॥

ऊंसाची ती मोळी हातानें पिळून
दिधला काढून रस प्याया ॥
गणूदास म्हणे अशक्य तें कांहीं
उरलेंच नाहीं समर्थाला ॥११॥
सोमवती पर्व माघमासीं आलें
लोक ते चालले दर्शनाला ॥
नर्मदेच्या कांठी बैसला धूर्जटी
द्याया भक्ता भेटी ओंकारी तो ॥
ओंकारेश्वर हे क्षेत्र पुरातन
पातकाचें दहन जेथे होई ॥
गणूदास म्हणे येथेची दीधला
शंकराचार्याला संन्यास तो ॥१२॥
येथे पुण्यश्लोक मांधाता भूपति
लोक अजुनि गाती कीर्ती ज्याची ॥
पूर्वपुण्य ज्याचें सबळ साचार
तोच येई नर क्षेत्रासी या
नर्मदेचें स्नान ओंकारदर्शन
घेत तया पुण्य बहुत लाभे ॥
गणूं म्हणे ऐशी माय ती नर्मदा
नुपेंक्षी हो कदा भक्तालागीं ॥१३॥
गजानन आले ऐशा त्या क्षेत्रासी
हर्ष नर्मदेसी बहुत झाला ॥
पाप्यांची पातकें क्षेत्रें घालवीती
तींच पावन होती साधुस्पर्शे ॥
नाव फुटल्याचें करुनी आमीष
नर्मदा सेवेस प्रकटली ॥
गणूदासम्हणे लावुनिया हात
पैल तटाप्रत नेली नौका ॥१४॥
धार कल्याणींचा साधु रंगनाथ
आला शेगांवांत भेटावया ॥
उभयतांमाजीं ब्रह्मचर्चा झाली
ती ज्यांनी ऐकिली तेचि धन्य ॥
साधूच्या मुखींचे शब्द हे अमृत
पडतां श्रवणांत तरुन जाय ॥
गणूदास म्हणे साधूची महती
देवही वानिती स्वर्गामध्ये ॥१५॥
साधूचा वशीला जयासी लागला
तोच सरता केला पांडुरंगे ॥
संत हे हरीच्या गळ्याचे ताईत
संत हे साक्षात कल्पतरु ॥
संत हेचि जाणा मोक्षाचे वाटाडे
तेवि ज्ञानगाडे प्रत्यक्षची ॥
गणूदास म्हणे आतां बोलू किती
रुक्मिणीचा पती नमी त्यासी ॥१६॥
अर्जुनाचें घोडे धूतसे भगवान
करी बाळंतपण चोखयाघरीं ॥

दामाजीपंताची रशीद बेदरी
झालासे हरी पोहोचवीता ॥
नाथाचे सदनीं पाणी तें वाहिले
शेत रक्षियलें सावत्याचें ॥
गणूदास म्हणे ऐसा संतप्रेमा
आहे पुरुषोत्तमा पहा तुम्ही ॥१७॥
आळंदी, पैठण, देहू, अष्टी, तेर
तैसां तो साचार सज्जनगड ॥
अरण, मंगळवेढें संतांची ही गांवें
तैसैचि लेखावें शेगांवला ||
कोणत्याही अंशें फरक नाहीं यांत
शेगांव साक्षात संतभूमी ॥
प्रभातीं या गांवा भावें आठवितां
गणूं म्हणे चिंता होते दूर ॥१८॥
नरजन्माचे या सार्थक करा रे
अहोरात्र ध्यारे पांडुरंगा ॥
गजाननापायीं दृढ श्रध्दा ठेवा
द्वेष तो नसावा कोणाचाही ॥
प्रत्येक गाहाणे सांगा संतापाशीं
होईल तो त्यासी निवटिता ॥
गणूदास हेंची सांगे वारंवार
जोडा आतां कर गजानना ॥१९॥
गुरुराया आमुची उपेक्षा न करी
तुझ्या बळावरी आमुच्या उड्या ॥
त्रिविध तापाचें निर्मूलन करा
आरोग्य शरीरा देऊनिया ॥
हात पसरण्याचा प्रसंग ना आणी
कोणापुढे जनीं गजानना ॥
गणूदास म्हणे आनंदीत वृत्ती
ठेवावी गुरुमूर्ति सर्वकाळ ॥२०॥
वारी शेगांवाची करी जो कां भक्त
तयासी अनंत सांभाळील ॥
गजाननापायीं शुद्ध ज्याची निष्ठा
तयालागी कष्टा दे ना हरी ॥
गजानन कीर्तिचे करी जो कां गान
तया नारायण दूर नाहीं॥
अनुभव याचा घ्या रे तुम्ही सारे
विनवी अत्यादरें दासगणूं ॥२१॥

**अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांवनिवासी समर्थ सद्गुरु श्रीगजानन महाराज की जय ||**